भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# वेतनांचे स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण (कराधानातून सूट) अधिनियम, १९६१

(सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ४६)

[ दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान ]

# The Voluntary Surrender of Salaries ( Exemption from Taxation ) Act, 1961

**(Act No. 46 of 1961)**

[ As in force on the 28th February 1994 ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९४
**[ किंमत : रु. १.९० पैसे ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथा विद्यमान असलेला व्हॉलंटरी सरेंडर ऑफ सॅलरीज (एक्झम्पशन फ्रॉम टॅक्सेशन) अॅक्ट, १९६१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ५ अंक १, दिनांक २३ जून १९९४ यात पृष्ठ २० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जून १९९४.

---

## PREFACE

This edition of the Voluntary Surrender of Salaries (Exemption from Taxation) Act, 1961 as on the 28th February 1994 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary Part XII, section 1, No. 1, Vol. 5, dated 23rd June 1994 on page 20.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Dated 23rd June, 1994.

एच ४२३० (१,०२१—१—९५)

# वेतनांचे स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण (कराधानातून सूट) अधिनियम, १९६१

कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव.

२. शासनाच्या प्रीत्यर्थ प्रत्यर्पित केलेल्या वेतनाच्या संबंधात प्राप्तीवरील करांमधून सूट.

३. भत्त्यांना लागू करावयाचे कलम २ चे उपबंध.

४. नियम करण्याची शक्ती.

५. निरसन.

शब्दसूची—
मराठी–इंग्रजी
इंग्रजी–मराठी

# वेतनांचे स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण (कराधानातून सूट) अधिनियम, १९६१

**(सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ४६)**

[दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान]

[६ डिसेंबर १९६१]

**एखाद्या व्यक्तीने स्वत:ला प्रदेय असलेल्या वेतनाचा किंवा भत्यांचा काही अंश लोकहितासाठी स्वेच्छने सोडून दिल्यास, त्या अंशाला प्राप्तीवरील करामधून सूट देण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास 'वेतनांचे स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण (कराधानातून सूट) अधिनियम, १९६१' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नांव**

१९२२ चा ११. २. 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२' यात किंवा प्राप्तीवरील कराधानासंबंधी त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीला— **शासनाच्या प्रीत्यर्थ प्रत्यर्पित केलेल्या वेतनाच्या संबंधात प्राप्तीवरील करांमधून सूट.**

(क) तिचे वेतन भारताच्या एकत्रित निधीतून किंवा राज्याच्या एकत्रित निधीतून दिले जात असेल तर, दिनांक ३१ मार्च १९६१ या दिवसानंतरच्या कोणत्याही कालावधीबद्दल तिला देय असलेल्या वेतनाचा जो भाग लोकहितासाठी प्रत्यर्पित करण्याबाबत तिने लेखी अधिकथनाद्वारे तयारी दाखवली असेल त्याबाबत ;

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत, दिनांक ३१ मार्च १९६१ या दिवसानंतरच्या कोणत्याही कालावधीबद्दल तिला देय असलेल्या वेतनाचा जो भाग, याबाबत केंद्र शासनाने केलेल्या नियमानुसार, तिने लोकहितासाठी त्या शासनाच्या प्रीत्यर्थ प्रत्यर्पित करून त्याच्याकडे भरणा केला असेल त्याबाबत,

कोणताही प्राप्तिकर किंवा अधिकार द्यावा लागणार नाही ;

आणि प्राप्तीवरील कराधानासंबंधीच्या कोणत्याही कायद्याच्या प्रयोजनापुरता वेतनाचा असा भाग तिच्या एकूण प्राप्तीमध्ये समाविष्ट केला जाणार नाही.

३. कलम २ चे उपबंध, त्यात निर्देशिलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीच्या वेतनासंबंधात जसे लागू आहेत तसे ते दिनांक ३१ मार्च १९६१ या दिवसानंतरच्या कोणत्याही कालावधीबद्दल तिला देय असलेल्या कोणत्याही भत्त्यांच्या संबंधात लागू होतील. **भत्त्यांना लागू करावयाचे कलम २ चे उपबंध.**

४. (१) या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्याकरिता केंद्र शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **नियम करण्याची शक्ती.**

(२) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर [1][ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा त्याहून अधिक सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल ; आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर,] त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले किंवा तो नियम केला जाऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

१९५० चा ६१. ५. (१) 'वेतनांचे स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण (कराधानातून सूट) अधिनियम, १९५०' हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **निरसन.**

(२) असे निरसन झाले तरीही, उक्त अधिनियमाखाली केलेले कोणतेही अधिकथन या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता केलेले अधिकथन असल्याचे मानले जाईल.

---

१. "एका सत्राने" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "संपण्यापूर्वी जर", या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर प्रत्यायोजित विधिविधान उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८५ (१९८६ चा ४) याद्वारे घातला (दिनांक १५ मे १९८६ रोजी व तेव्हापासून).

# वेतनांचे स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण (कराधानातून सूट) अधिनियम, १९६१

## THE VOLUNTARY SURRENDER OF SALARIES (EXEMPTION FROM TAXATION) ACT, 1961

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकर | .. | super tax | [ क. २ ] |
| प्राप्तिकर | .. | income-tax | [ क. २ ] |
| प्राप्तीवरील कराधान | .. | taxation on income | [ क. २ (ख) ] |
| शून्यीकरण | .. | annulment | [ क. ४ (२) ] |
| स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण | .. | voluntary surrender | [ क. १ ] |

---

## THE VOLUNTARY SURRENDER OF SALARIES (EXEMPTION FROM TAXATION) ACT, 1961

# वेतनांचे स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण (कराधानातून सूट) अधिनियम, १९६१

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | | |
|---|---|---|---|
| annulment | .. | शून्यीकरण | [ S. 4 (2) ] |
| income-tax | .. | प्राप्तीकर | [ S. 2 ] |
| super tax | .. | अधिकर | [ S. 2 ] |
| taxation on income | .. | प्राप्तीवरील कराधान | [ S. 2 (b) ] |
| voluntary surrender | .. | स्वेच्छापूर्वक प्रत्यर्पण | [ S. 1 ] |